**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:03.06.2025** **वार:मंगळवार**

---

आकाशवाणी, पुणे, स्वाती महाळंक प्रादेशिक बातम्या देत आहे....

भारत जगातलं वेगानं विकसित होणारं तिसरं मोठं हवाई क्षेत्र असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन,
केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान आज पुणे दौऱ्यावर,
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या गुरुवारी नागपूर- मुंबई महामार्गावरील शेवटच्या टप्प्यातल्या समृद्धी महामार्गाचं उद्घाटन,
दहशतवाद विरोधी पथकाचे ठाणे जिल्ह्यात 22 ठिकाणी छापे; 12 संशयितांना घेतलं ताब्यात,
आणि
आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात आज लढत.

**मोदी**

बाजारपेठ, तंत्रज्ञान तसंच नवोन्मेषासाठी वाव आणि व्यापारासाठी खुलं धोरण, यामुळे भारत जगातलं वेगानं विकसित होणारं तिसरं मोठं हवाई क्षेत्र असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आय ए टी ए अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या ८१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते काल बोलत होते.
आंतरराष्ट्रीय सहकार्य, हवामान बदल आणि जागतिक हवाई वाहतुकीच्या उद्दीष्टांना पुढे नेण्याचं हे व्यासपीठ असल्याचं पंतप्रधान म्हणाले. हवाई क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर झालेल्या सुविधांमुळे आगामी काळात हे क्षेत्र मोठ्या बदलांचं केंद्र बनेल, असं त्यांनी नमूद केलं. भारत सरकारच्या उडान योजनेचा उल्लेख करत पंतप्रधानांनी, 2014 पासून देशातल्या हवाई क्षेत्रात झालेल्या बदलांची माहिती दिली. पंतप्रधान म्हणाले,

भारत अपने इस potential को maximize करने के लिए futuristic roadmap पर काम कर रहा है। हम World-Class एयरपोर्ट इंफ्रास्ट्रक्चर में इन्वेस्ट कर रहे हैं। जैसा नायडू जी ने बताया, 2014 तक भारत में 74 ऑपरेशनल एयरपोर्ट्स थे। आज इनकी संख्या बढ़कर 162 हो चुकी है। indian carriers ने 2000 से ज़्यादा नए Aircraft के लिए orders दिए हैं। और ये तो अभी शुरुआत है। भारत का एविएशन सेक्टर एक ऐसे Take Off Point पर खड़ा है, जहां से उसे लंबी और सबसे ऊंची उड़ान भरनी है। और ये उड़ान केवल भौगोलिक सीमाओं को पार नहीं करेगी, बल्कि ये दुनिया को Sustainability, Green Mobility, और Equitable Access की दिशा में भी ले जाएगी।

पुढच्या पाच वर्षात देशात 50 विमानतळ विकसित करणार असल्याची घोषणा यावेळी नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी केली. रविवारपासून सुरू झालेल्या आय ए टी ए कार्यक्रमाची आज सांगता होईल.

**चौहान**

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान आज पुणे दौऱ्यावर आहेत. पुणे जिल्ह्यात नारायणगाव इथं ते टोमॅटो बाजारपेठेला भेट देणार असून तिथं शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर ते पुण्याच्या कृषि महाविद्यालयाला भेट देणार असून तिथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विकसित कृषि संकल्प अभियानाअंतर्गत सुरू असलेल्या कृषी हॅकेथॉन कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**पेडगाव अभियान**

देशभरात सध्या विकसित कृषि संकल्प अभियान सुरू आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात पेडगाव इथल्या अभियानात मोठ्या संख्येनं महिला शेतकरी सहभागी झाल्या होत्या. त्यांच्यासाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि ड्रोन प्रात्यक्षिक सादरीकरण करण्यात आलं. याबाबतची एका शेतकरी महिलेची ही प्रतिक्रिया....

पेडगावमध्ये कृषि विद्यापीठाचे खूप अधिकारी आले होते. आम्हा महिलांना खूप छान माहिती मिळाली. नवनवीन तंत्रज्ञान नवनवीन प्रयोग सांगितले आणि ड्रोन  दीदी विषयी खूप छान  माहिती दिली. आम्ही महिला असं ड्रोन विषयी ऐकलं होतं लग्नामध्ये पहिलं होतं पण असं प्रत्यक्षात आज फवारते वेळेस पहिलं आम्हा महिलाना खूप आनंद मिळाला.

**ओळखपत्र**

देशातल्या सहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं आत्तापर्यंत तयार करण्यात आली आहेत. केंद्र सरकारनं जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत ही माहिती देण्यात आली आहे. या ओळखपत्रांद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदी, पशुधन, पिकांची माहिती आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नाची नोंद केली जाणार आहे. या ओळखपत्रांचा उपयोग शेतकऱ्यांना पीकविमा तसंच प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळवण्यासाठी होणार आहे. महाराष्ट्रात 99 लाख शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं तयार करण्यात आली  आहेत.

**उद्घाटन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या गुरुवारी, पाच जून रोजी नागपूर- मुंबई महामार्गावरील 76 किलोमीटर लांबीच्या, शेवटच्या टप्प्यातल्या समृद्धी महामार्गाचं उद्घाटन करण्यात येणार आहे. नाशिकच्या इगतपुरी ते ठाण्यातल्या आमणे यांना जोडणारा हा 701 किलोमीटर लांबीचा हाय-स्पीड कॉरिडॉरचा

शेवटचा टप्पा आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यामुळे समृद्धी महामार्गावरुन आता नागपूर ते मुंबई थेट प्रवास करता येणार असल्याची माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

**<u>करार</u>**

विदर्भातल्या सिकलसेल आणि थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांच्या उपचारांची सोय व्हावी आणि त्यांचं उपचारांसाठी मुंबईवर असलेलं अवलंबित्व कमी व्हावं यासाठी भारतीय आयुर्विज्ञान संस्था – एम्स, नागपूर इथं बोन मॅरो ट्रान्सप्लांट युनिट सुरू करण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली होती. या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद देत एसटीपीसीनं या केंद्रासाठी अर्थसहाय्य दिलं आहे. याबाबतच्या सामंजस्य करारावर काल स्वाक्षरी करण्यात आली. या कराराअंतर्गत एनटीपीसी त्यांच्या सामाजिक दायित्व निधी उपक्रमांतर्गत एम्स नागपूरला आर्थिक मदत करणार आहे.

**<u>उद्घाटन</u>**

“नागरिकांच्या बदलत्या जीवनशैलीमुळे विविध आजारांचं प्रमाण वाढत असून अशा आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक उपचार पद्धतीसोबत संयमी जीवनशैली आवश्यक आहे”, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाशिकमध्ये केलं. श्री साईबाबा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, हार्ट इन्स्टिट्यूट ॲण्ड रिसर्च सेंटर नाशिकच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यासह लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

**<u>कोरोना-भूषण</u>**

राज्यातील कोरोना रुग्णसंख्येत वाढ झाली असून, काल राज्यात 65 नवीन रुग्ण आढळले आहेत. त्यात पुण्यात सर्वाधिक 25 रुग्ण असून, मुंबईत 22 कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यात या वर्षात आतापर्यंत एकंदर 814 कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. यातील 300 रुग्ण बरे झाले असून 506 रुग्णांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यात कोरोनाचे दोन नवे रुग्ण सापडले असून यातील एकावर नगरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर दुसऱ्याला पुढील उपचारासाठी पुण्याला हलवण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेराव चव्हाण यांनी दिली.

**<u>पालखी प्रस्थान</u>**

आषाढी एकादशीसाठी बुलडाणा जिल्ह्यातल्या शेगाव इथून संत श्री गजानन महाराजांची पालखी विठ्ठल नामाच्या जयघोषात काल पंढरपूरकडे रवाना झाली. पालखीसोबत सातशे वारकरी, पताकाधारी,

अश्व आणि गजांचा सहभाग आहे. ही दिंडी 33 दिवस 725 किलोमीटरचा पायी प्रवास करत चार जुलैला पंढरपूरला पोहचेल. पालखीचं हे 56 वं वर्ष आहे.

**छापे**

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकानं काल ठाणे जिल्ह्यात 22 ठिकाणी छापेमारी करून 12 संशयितांना ताब्यात घेतलं आहे. दहशतवाद विरोधी पथकानं पडघा इथं 2003 च्या मुंबई सेंट्रल आणि मुलुंड बॉम्बस्फोट प्रकरणातला आरोपी, सिमी या बंदी घातलेल्या संघटनेचा माजी सदस्य साकिब नाचण याच्या घरावर छापा टाकला. 2017 मध्ये शिक्षा पूर्ण केल्यानंतर नाचण पुन्हा दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या संशयावरुन ही कारवाई करण्यात आली. साकिब नाचण, अकिब साकिब नाचण, अब्दुल लतीफ कासकर, कैफ नाचण, शाजील नाचण, फारक झुबेर मुल्ला यांच्यासह प्रतिबंधित संघटना सिम्मीच्या काही माजी पदाधिकाऱ्यांच्या घरांची आणि परिसराची एटीएसनं झडती घेतली. या झडती दरम्यान 6 जण त्यांच्या घरात आढळले नाहीत. ए टी एस नं पुढील तपासासाठी 12 जणांना ताब्यात घेतलं आहे.

**लिलाव**

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत इथल्या आडत दुकानदारानं टोमॅटो खरेदी करून सात महिने झाले तरी शेतकऱ्यांचे अडीच कोटी रुपये दिले नसल्यानं काल सकाळी शेतकऱ्यांनी बाजार समितीचे लिलाव अचानक बंद पाडले. अखेर पोलिस, बाजार समिती आणि आंदोलक यांनी चर्चा करून येत्या 17 तारखेपर्यंत सर्व पैसे देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं. त्यानंतर कांदा आणि टोमॅटोचे लिलाव पुन्हा सुरू झाले.

**आय पी एल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. बेंगळुरू संघाचं नेतृत्व रजत पाटीदार याच्याकडे आहे तर पंजाब किंग्जचं कर्णधारपद श्रेयस अय्यर याच्याकडे आहे. 2008 मध्ये सुरू झालेल्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेत हे दोन्ही संघ एकदाही करंडक जिंकू शकलेले नाहीत. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा विजय महत्त्वाचा ठरणार आहे.

**<u>हवामान</u>**

उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.